# ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

ई-मेल : rgpsazpsindhudurg@gmail.com दुरध्वनी : ०२३६२-२२८७९६

दालन क्र.१३९, जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, पहिला मजला, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग - ४१६ ८१२

ISO 9001:2015


सिंजिप/ग्राप/राग्रास्वअ/अभ्यासदौरा/निविदा/2901 /२०२३-२४ दि.11/10/2023

## जाहीर निविदा सुचना

**विषय : राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०२३-२४ मध्ये राज्यांतर्गत अभ्यास दौ-यासाठी लक्झरी बसचे (वाहन+ निवास व्यवस्था+भोजन व्यवस्था इ. सुविधेसह) कोटेशन /दरपत्रक मिळणेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०२३-२४ मध्ये राज्यांतर्गत अभ्यास दौऱ्यासाठी जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत एकुण ९० प्रतिनिधींकरिता सोलापूर जिल्हा (४५ प्रतिनिधी) येथे ०४ दिवसीय (३ रात्री ४ दिवस) अभ्यास दौरा करणेकामी एक बॅच व पुणे जिल्हा (४५ प्रतिनिधी) येथे ०४ दिवसीय (३ रात्री ४ दिवस) अभ्यास दौरा करणे कामी दुसरी बॅच असे दोन वेगवेगळया कालावधीमध्ये सदर जिल्हयांमध्ये उत्कृष्ट व नाविन्यपुर्ण कामकाज केलेल्या पंचायत समिती, ग्रामपंचायती, कृषी केंद्र, शाळा, अंगणवाडीचा अभ्यास करणेकामी अभ्यास दौ-याचे आयोजन करावयाचे आहे.

सदर अभ्यास दौ-याकरिता मान्यताकृत ट्रॅव्हल्स / यात्रा कंपनीकडून एक बॅच ४५ व दुसरी बॅच ४५ प्रतिनिधींसाठी लक्झरी बसचे (वाहन + निवास व्यवस्था+ भोजन व्यवस्था इ.सुविधेसह) **दि. १२/१०/२०२३ ते दि. २०/१०/२०२३** या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळुन) खालील अटि शर्तीस अधिन राहून कोटेशन/ दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**अटि व शर्ती खालीलप्रमाणे :**

१. ट्रॅव्हल्स कंपनी मान्यताकृत असावी.
२. उक्त प्रति अभ्यास दौरा अंदाजित १२०० ते १४०० किलोमीटरचा असेल त्यानुसार कोटेशन सादर करावे.
३. अभ्यास दौ-यात एक बॅचमध्ये एकुण ४५ प्रतिनिधींचा व दुसऱ्या बॅचमध्ये एकुण ४५ प्रतिनिधींचा समावेश राहणार आहे.
४. कोटेशन वातानुकुलित वाहन + नॉन एसी निवास +१ वेळ नाश्ता, २ वेळ चहा, २ वेळ भोजन, मिनरल वॉटर(प्रतिदिन) याप्रकारे सादर करण्यात यावे. (निवास : एका रूममध्ये २ व्यक्ती व भोजन (व्हेज व नॉनव्हेज) दर्जा उच्च प्रतीचा असावा.
५. दरपत्रकातील दर हे सर्व करांसहित समाविष्ट असावेत.
६. सिलबंद कोटेशन / दरपत्रक उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे नावे ग्रामपंचायत विभागात समक्ष **दि.२०/१०/२०२३ रोजी सायंकाळी ०५.००** वाजेपर्यंत सादर करण्यात यावीत.
७. सदर दरपत्रके / कोटेशन दि. **२३/१०/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.००** वाजता मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांचे दालनातमध्ये उघडणेत येतील. मुदतीत प्राप्त न झालेले अथवा इतर कुठल्याही कारणाने विलंबाने प्राप्त झालेल्या कोटेशन /दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
८. प्राप्त कोटेशन पैकी ज्या ट्रॅव्हल्स कंपनीचे कोटेशन अभ्यास दौ-यासाठी अंतिम केले जातील, त्या ट्रॅव्हल्स कंपनीने करार करतेवेळी मान्यता / परवाना, अनुभव व अनुषंगिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.
९. आयकर विभागाकडील पॅनकार्डची छायांकित प्रत तसेच आधार कार्ड छायांकित प्रत सोबत जोडणेत यावी.
१०. सदर अभ्यास दौ-यामध्ये टोल, पांर्किंग, पोलिस एन्ट्री व इतर तत्सम चार्जेस यात्रा कंपनीने अदा करावयाचे आहेत.
११. कोणतेही एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा, संपूर्ण दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचा, फेर दरपत्रक मागविण्याचे अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे.
१२. सदर अभ्यास दौरा नैसर्गिक कारणास्तव वा इतर कारणास्तव इतरत्र आयोजित करण्याचा अंशत: बदल करण्याचा किंवा पुर्णत: अभ्यास दौरा रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीत यांजकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(विशाल तनपुरे)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

**प्रत : मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिलहा परिषद सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी सविनय सादर...**